**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

Original Article

# ठाणे जिल्ह्यामधील शेतीपूरक व्यवसायामधील संधी आणि आव्हाने - एक अभ्यास

**रुपेश वासुदेव पाटील[1], डॉ. किशन एस. बाभुळगावकर[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, पीपल्स कॉलेज, नांदेड
[2] श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमत, जि. हिंगोली
**Email:** rupeshpatilrupesh975@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180137
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 1(A)
Pp. 181-185
January - 2026

**Submitted:** 18 Dec. 2025
**Revised:** 28 Dec. 2025
**Accepted:** 13 Jan. 2026
**Published:** 31 Jan. 2026

***गोषवारा***

*शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जात असला तरी देखील केवळ शेती उत्पादनाच्या आधारे ग्रामीण भाग, शेती आणि शेतकरी यांचा विकास घडून आणणे शक्य नाही. म्हणूनच देशामध्ये शेती आणि शतकरी यांना सहाय्य करण्यासाठी शेतीपूरक व्यवसायांच्या विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयामधील स्थिती देखील काही वेगळी नाही . महाराष्ट्रातील औद्योगिकिकरण झालेला जिल्हा म्हणून ओळख असणाऱ्या ठाणे जिल्हयामध्ये आज देखील एकुण ८०७ गावे असून या गावांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. एवढेच नाही तर जिल्ह्यामधी शहापूर तालुका आज देखील आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो.त्यामुळे जिल्ह्यामधील शेती आणि शेतकरी यांचा विकास करण्यासाठी शेतीपूरक व्यवसायांच्या विकास आणि विस्ताराची नितांत आवश्यकता आहे. म्हणून जिल्ह्यामधील शेतीपूरक व्यवसायांचा झालेला विकास अभ्यासणे आवश्यक आहे. शेतीपूरक व्यवसायांचा विकास अभ्यासताना जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसायाचे महत्व, शेतीपूरक उद्योगांसामोरील अडचणी यांचा अभ्यास करून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविण्यात आल्या आहे.*

***मुख्यशब्द:*** *ठाणे, शेतीपूरक व्यवसाय, विकास, संधी, अव्हाने*

## प्रस्तावना

ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणाऱ्या जिल्ह्यांपैकी एक असून येथे औद्योगिकीकरणाबरोबरच शेती व शेतीपूरक व्यवसायांना विशेष महत्त्व आहे. जिल्ह्यातील भौगोलिक विविधता, पर्जन्यमान, वनसंपदा आणि वाढती शहरी बाजारपेठ यांमुळे शेतीपूरक व्यवसायांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यशेती, फुलशेती, कृषी पर्यटन आणि बंदिस्थ शेळीपालन इत्यादी व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देत आहेत. असे असले तरी या क्षेत्रामध्ये अनेक आव्हानेही आहेत, जसेकी भांडवलाची कमतरता, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, साठवणूक व वाहतूक सुविधा, प्रशिक्षणाचा अभाव, शासकीय योजनांची अपुरी माहिती इत्यादी समस्या शेतकऱ्यांच्या प्रगतीत अडथळा निर्माण करतात. म्हणून जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसायांच्या संधी व आव्हानांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

## संशोधांची उद्धीष्टे

१. जिल्हयातील शेतीपूरक व्यवसायांच्या विकासाचा आढावा घेणे.
२. जिल्हयातील शेतीपूरक व्यवसायांमधील संधी शोधणे.
३. जिल्हयातील शेतीपूरक व्यवसायांच्या समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
४. जिल्हयातील शेतीपूरक विकासासाठी उपाययोजना सुचवणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*रुपेश वासुदेव पाटील, संशोधक विद्यार्थी, पीपल्स कॉलेज, नांदेड*

**How to cite this article:**
*पाटील, . रुपेश . वासुदेव ., & बाभुळगावकर, . किशन . एस . (2026). ठाणे जिल्ह्यामधील शेतीपूरक व्यवसायामधील संधी आणि आव्हाने - एक अभ्यास. Journal of Research & Development, 18(1(A)), 181–185. https://doi.org/10.5281/zenodo.18619428*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18619428
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

**संशोधांचे महत्व**

देशातील शेतीचा आणि शेतकरी यांचा विकास शेतीपूरक व्यवसायांच्या विकासाशिवाय शक्य नाही, हे विचारात घेऊन शासनामार्फत शेतीपूरक व्यवसायांच्या विकासावर भर दिला आहे. याचा अनुकूल परिणाम भारतीय शेती शेतकरी यांच्यावर झालेला दिसून येत असला तरी या शेतीपूरक व्यवसायांची आवश्यकता आणि झालेला विकास सर्वत्र समान नाही. म्हणूनच या शेतीपूरक व्यवसायांचे ठाणे जिल्ह्यामध्ये किती महत्व आहे, त्यांचा किती विकास झाला आहे, त्याच्या समस्या काय आणि त्यावर कोणत्या उपाय योजना करता येतील याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

सादर संशोधन हे केवळ सन २०१४ साली विभाजीत झालेल्या ठाणे जिल्ह्यातील शेतीपूरक उद्योगांचे महत्व, त्यांचा झालेला विकास, त्यांच्या समस्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठीच्या उपाय योजना याच्याशी संबंधित आहे.

**माहितीचे स्त्रोत**

सदर अभ्यास विषयाचे विवेचन हे प्रामुख्याने दुय्यम सामग्रीवर आधारित असून यामध्ये माहिती गोळा करण्यासाठी ठाणे जिल्हा संखीकीय संचालनालयाचे वार्षिक अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल, शेतीपूरक व्यवसायांशी संबंधी असणारी पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांच्यासह काही शासकीय संकेतस्थळ यांचा संदर्भ घेण्यात आला आहे.

**शेतीपूरक व्यवसायांचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासातील महत्व:**

**१. अल्प भांडवलाची आवश्यकता:**

स्वताचा आर्थिक विकास साधण्यासाठी कृषी क्षेत्रातील होतकरू उद्योजकांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये आपला स्वताचा व्यवसाय सुरु करण्याचा विचार केला असता त्यांना तत्काळ भांडवलाच्या समस्येचा सामना करावा लागतो. कारण उद्योग उभारणीमध्ये स्थिर आणि खेळते अश्या दोन्ही स्वरुपात भांडावलाची मोठ्याप्रमाणात गरज असते. भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पाहता हे भांडवल उभारणे त्यांना शक्य होत नाही. परंतु शेतीपूरक व्यवसाय सुरु करण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेने खूप कमी भांडवल लागत असल्यामुळे शेतकऱ्यांना या व्यवसायांची उभारणी करून आपला विकास साधने शक्य आहे.

**२. उत्पादनाचे विविधीकरण:**

शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकरी एका ठराविक पिकांवर अवलंबून न राहता शेतीबरोबरच पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशीपालन, खाद्यप्रक्रिया इत्यादी पूरक उपक्रम एकत्रितपणे सुरु करतात .त्यामुळे एका क्षेत्रात तोटा झाल्यास इतर क्षेत्रातील कमाई त्याची भरपाई शेतकऱ्याला आपल्या शेतीपूरक व्यवसायाच्या आधारे करणे शक्य होते. त्याचबरोबर शेतीपूरक व्यवसायामध्ये शेतकरी शेती उत्पादनावर प्रक्रिया देखील करून शकतो त्यामुळे देखील मूल्यवर्धित उत्पादने तयार होऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये वाढ होते.

**३. जोखीम घट:**

शेती ही नैसर्गिक घटकांवर अवलंबून असल्यामुळे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, रोगराई, किंवा बाजारभाव घसरणे अशा अनेक जोखमींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतीपूरक व्यवसाय शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा संरक्षक कवच म्हणून कार्य करतात. कारण दुध व्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, मधमाशी पालन, मशरूम उत्पादन, मत्स्यपालन यांसारख्या पूरक व्यवसायामध्ये शेती उत्पादनाच्या तुलनेने कमी जोखीम असते.

**४. अखंडित उत्पन्न प्राप्ती:**

पारंपरिक शेती हि पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने या शेतीमार्फत केवळ हंगामाच्या काळात उत्पन्न मिळते इतर वेळी उत्पन्न पूर्णपणे थांबते. यामुळे दैनंदिन खर्च, शेती गुंतवणूक, कर्जफेड यांमध्ये अडचणी निर्माण होतात. शेतकऱ्यांची हि समस्या सोडविण्यासाठी शेतीपूरक व्यवसाय उपयुक्त ठरतात दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधमाशीपालन, मशरूम उत्पादन, भाजीपाला प्रक्रिया, मत्स्यपालन इ. व्यवसायांतून होणाऱ्या उत्पादनाची दररोज, आठवड्यानुसार किंवा मासिक स्वरूपात विक्री होत असल्याने शेतकऱ्यांना सतत रोख प्रवाह मिळतो. यामुळे आर्थिक स्थैर्य वाढते, जोखीम कमी होते आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण होतात.

**ठाणे जिल्ह्यामधील शेतीपूरक व्यवसाय:**

**१. दुग्ध व्यवसाय:**

जिल्ह्यामध्ये गायी आणि म्हैस दोन्हीचे उतपादन घेतले जाते. ठाणे जिल्ह्यामधील मुरबाड, भिवंडी, शहापूर आणि अंबरनाथ या तालुक्यामध्ये दुग्ध उत्पादन मोठ्याप्रमाणात केले जाते. २०१९ साली झालेल्या पशुगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण पशूंची संख्या २३६१५४ असून यामध्ये गायी आणि बैल यांची संख्या ७९५२२ आहे जी एकूण पशूंच्या ३३.६७टक्के आहे तर म्हशी आणि रेडे यांची संख्या ९२५२१ इतकी असून ती एकूण पशूंच्या ३९.१८ टक्के इतकी आहे. सन २०२३-२४ मध्ये जिल्ह्यामध्ये ९४.९० हजार लिटर म्हणजे प्रतिदिन सरासरी ०.२६ हजार लिटर दुध गोळा करण्यात आले. एकूण दूध उत्पादनापैकी ७% मिश्र जातीच्या गायींकडून, ९% देशी गायींकडून, ८३% म्हशींकडून आणि १% बकऱ्यांकडून येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-1(A)| January - 2026

**२. कुकुट पालन :**

दुध उत्पादनाबरोबरच ठाणे जिल्हयातील शेतकरी करत असलेला दुसरा शेती पूरक व्यवसाय म्हणजे कुकुट पालन होय. मुंबई, ठाणे आणि नाशिकसारख्या शहरांच्या जवळ असल्यामुळे कुक्कुटपालन व्यवसाय हा जिल्हयातील एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. जिल्हयातील १९ व्या पशुधन गणनेनुसार जिल्हयातील कुक्कुटपालकांची एकूण संख्या २९,४५,०४१ आहे. २० व्या पशुधन गणनेनुसार कोंबड्यांची संख्या अद्याप उपलब्ध नाही. एकात्मिक नमुना सर्वेक्षण २०१७-१८ नुसार ठाणे जिल्हयात २०१७-१८ या वर्षात २६३.५५ लाख अंडी उत्पादन झाले.

**३. मत्स्यव्यवसाय :**

जिल्हयाला एकूण २७ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे त्यामुळे ठाणे जिल्हयातील शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसाय हा एक शेती पूरक व्यवसाय प्राप्त झाला आहे. सागरी मत्स्यव्यवसायाबरोबरच ठाणे जिल्हयामध्ये भूजल मत्स्यव्यवसाय देखील केला जातो. जिल्हयामध्ये तळी, सरोवर आणि जलाशये मिळून एकूण ७६४० हेक्टर जमिनीवर भूजल मत्स्य व्यवसाय केला जातो. २०२३-२४ च्या आकडेवारीनुसार जिल्हयामध्ये २६९५ मे. टन भूजल मत्स्य उतपादन घेण्यात आले. तर या उत्पादनाला २४२५ लाख इतकी किंमत मिळाली.

**४. शेळीपालन:**

ठाणे जिल्हयातील ग्रामीण लोकसंख्येला शेळीपालन रोजगार आणि उत्पन्नाची सुरक्षा प्रदान करते. शेळीपालनास गरिबांचे 'ए. टी. एम.' म्हणून ओळखले जाते कारण ते उच्च तरलता प्रदान करते. याशिवाय, शेळीचे मांस हा प्रथिनांचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. जिल्हयात १,३४,५१४ हेक्टर वनक्षेत्र,१०,५१० हेक्टर लागवडीयोग्य बंजर जमीन, १५५८ हेक्टर सध्याची पडीक जमीन आणि ६९३६ हेक्टर इतर पडीक जमीन आहे. ही जमीन बकऱ्यांचे संगोपन टिकवून ठेवू शकते. जिल्हयात तसेच मुंबई महानगरात बकऱ्याच्या मांसाला मोठी मागणी आहे. २० व्या पशुधन जनगणनेनुसार, जिल्हयात ६०,०४५ बकऱ्या आहेत.

**ठाणे जिल्ह्यामधील शेतीपूरक व्यवसायामधील संधी :**

**१. दुग्ध व्यवसायामधील संधी :**

ठाणे जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसाय विकासाला चांगली संधी आहे. कारण ठाणे आणि मुंबई महानगरात तयार बाजारपेठ असल्यामुळे ठाणे जिल्ह्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन आणि विक्री करण्याची चांगली संधी आहे. एवढेच नव्हे तर चांगला पाऊस आणि जंगल आच्छादन यामुळे गुरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागात घेतलेले दुधाचे उत्पादन शहरातील ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी रस्त्यांची उपलब्धता आहे. दुध व्यवसायासाठी गुरे खरेदी करण्यासाठी जिल्ह्यामध्ये मुरबाड तालुक्यातील सरलगाव येथे आणि कल्याण येथे गुरांची बाजारपेठ आहे. याशिवाय अहमदनगर जिल्ह्यातील लोणी आणि घोडेगाव येथे आणि मुंबईतील गोरेगाव येथेही दुभत्या गुरेढोरे उपलब्ध आहेत. गुजरात आणि हरियाणा राज्यांमधून गुरेढोरे आणि म्हशींच्या उच्च उत्पन्न देणाऱ्या दुधाच्या जाती खरेदी करून आणणे सोयीस्कर आहे. साहजिकच वरील सर्व अनुकूल परिस्थितीमुळे जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसायाचा विकास होणे सहज शक्य आहे.

**२. कुक्कुट पालन व्यवसायामधील संधी:**

ठाणे जिल्ह्या लागत असणाऱ्या मुंबई आणि इतर उपनगरामध्ये अंडी आणि चिकन यांना मोठी मागणी असल्यामुळे कुक्कुटपालन व्यवसाय हा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. आज हि राज्यामध्ये कुक्कुट उत्पादनाला असणाऱ्या मागणीच्या तुलनेने पुरवठा कमी आसल्यामुळे आंध्र प्रदेशातून मोठ्या प्रमाणात कुक्कुटपालन उत्पादने आयात केली जात आहेत. त्यामुळे कंत्राटी ब्रॉयलर शेतीसाठी ठाणे जिल्हा महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणून उदयाला आला आहे. त्याचबरोबर मेसर्स वेंकटेश्वर हॅचरीज लिमिटेड, प्रीमियम चिक फीड्स प्रा. लिमिटेड, सुगुना हॅचरीज अँड प्रीमियम हॅचरीज अँड फार्म्स प्रा. लिमिटेड हे प्रमुख समाकलक कंत्राटी ब्रॉयलर शेतीमध्ये गुंतलेले आहेत. म्हणून जिल्ह्यामध्ये कुक्कुट पालन व्यवसायाला मोठ्या संधी आहेत. जिल्ह्यातील एकोणिसाव्या पशुधन गणनेनुसार कोंबड्यांच्या संख्येत ४,६९,६२१ घरामागील पक्षी आणि २४,७५,४२० पोल्ट्री फार्म आणि हॅचरी पक्ष्यांचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कुक्कुटपालकांची एकूण संख्या २९,४५०४१ इतकी आहे.

**३. कृषी पर्यटन व्यवसायामधील संधी:**

देशामध्ये १९८० च्या दशकापासून कृषी पर्यटन संकल्पनेने व्यावसायिक स्वरूप प्राप्त केले आहे. यामध्ये कृषिरत्न चंद्रशेखर भडसावळे यांचे योगदान महत्वाचे आहे . या कृषी पर्यटन व्यवसायामध्ये यश संपादन करण्याची चांगली संधी ठाणे जिल्ह्यातील शेतकरी वर्गाला आहे. ठाणे, मुंबई आणि इतर जिल्ह्यालगत असणाऱ्या मोठ्या शहरांमध्ये आज स्थायिक झालेला बहुतांशी कामगार वर्ग हा मुळचा ग्रामीण भागातून स्थलांतरित झालेला आहे. त्यामुळे या वर्गाला आज देखील ग्रामीण भागातील जीवनमान तेथील आहार यांचे आकर्षण आहे. परंतु गाव दूर असल्यामुळे या नागरिकांना सुट्टीच्या अल्प वेळामध्ये हा आनंद घेणे शक्य होत नाही. या नागरिकांना कृषी पर्यटनाच्या रूपाने या सुविधा उपलब्ध करून देऊन उत्पन्न कमाविण्याची चांगली संधी ठाणे जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना आहे. कारण ठाणे जिल्हा मुंबई पासून जेमतेम ५० ते ६० किलोमीटर दूर असल्यामुळे या भागामध्ये या शहरी नागरिकांना येऊन ग्रामीण जीवनाचा आनंद घेणे सहज शक्य आहे.कृषी पर्यटनामध्ये बैलगाडी प्रवास, चुलीवारचे जेवण, शेती पिके, फळे आणि फुले यांचे दर्शन, स्थानिक पारंपारिक जेवण या सारख्या सुविधांचे शहरामध्ये स्थायिक झालेल्या लोकांमध्ये मोठे आकर्षण आहे.

**४. मत्स्य व्यवसायामधील संधी :**

जिल्ह्यात सागरी, अंतर्देशीय आणि खारट पाण्यातील मत्स्यपालन अशा सर्व प्रकारच्या मत्स्यव्यवसाय उपक्रमांचा व्यावसायिक प्रसार करण्याच्यामोठ्या संधी उपलब्ध आहेत. तथापि, जिल्ह्याच्या विभाजनानंतर, सागरी आणि खाऱ्या पाण्याच्या मत्स्यपालनाखालील प्रमुख संसाधने नव्याने स्थापन झालेल्या पालघर जिल्ह्याखाली येत असली तरी जिल्ह्यामध्ये ग्रामीण तलाव, पाण्याने भरलेले क्षेत्र, जलाशय, सिंचन तलाव आणि नद्या इत्यादींच्या रूपात अंतर्देशीय मत्स्यपालनाची संभाव्य संसाधने आहेत. याशिवाय काही हंगामी/बारमाही नद्या आहेत. उल्हास, वैतरणा, बरवी आणि भातसा. जिल्ह्यातील नदीची एकूण लांबी ६१४ कि. मी. आहे आणि ७६४० हेक्टर क्षेत्रावर पसरलेले १६० जलसाठे आहेत. ही संसाधने अंतर्देशीय मत्स्यपालनासाठी मोठ्या संधी उपलब्ध करून देतात. मात्र, मत्स्यव्यवसायासाठी केवळ ३६५८ हेक्टर क्षेत्राचा वापर करण्यात आला आहे. अजूनही पाण्याचे मोठे क्षेत्र आहे ज्याचा मत्स्यव्यवसायासाठी वापर केला जात नाही. जिल्ह्यातील मत्स्यपालनकरताना प्रक्रिया आणि मूल्यवर्धन करण्यासाठी कमी किमतीच्या माशांच्या प्रचंड संसाधनांचा वापर केला असता केवळ किनारपट्टीवरील समुदायांसाठी व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होणार नाहीत तर सागरी मासेमारीच्या व्यवहार्यतेत आणि शाश्वततेतही सुधारणा होईल.

**५. बंदिस्त शेळीपालन व्यवसायातील संधी:**

ठाणे जिल्हा मुंबई महानगराच्या जवळ असल्यामुळे येथे मांस व शेळीच्या दुधाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यामध्ये बंदिस्त शेळीपालन हा व्यवसाय अत्यंत फायदेशीर ठरतो. या पद्धतीत मर्यादित जागेत, नियंत्रीत आहार व आरोग्य व्यवस्थापनाद्वारे अधिक उत्पादन घेता येते. शहापूर, मुरबाड, भिवंडी, कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यामध्ये उपलब्ध चारा, शेती अवशेष जसेकी भुसा, कडबा, भाजीपाल्याचे अवशेष यांचा शेळयांना खाद्य म्हणून वापर करणे शक्य आहे. उस्मानाबादी, संगमनेरी, सिरोही अशा सुधारित जाती जलद वजनवाढ व कमी रोगप्रसार बंदिस्त पद्धतीस अनुकूल आहेत. महिला बचतगट, अल्पभूधारक शेतकरी व युवकांसाठी हा व्यवसाय कमी भांडवलात सुरू होऊन रोजगारनिर्मिती व पूरक उत्पन्न देऊ शकतो. योग्य व्यवस्थापन, बाजाराशी थेट संबंध यामुळे ठाणे जिल्ह्यात बंदिस्त शेळीपालन व्यवसायाला उज्ज्वल संधी आहे.

**शेतीपूरक व्यवसायांसमोरील आव्हाने :**

ठाणे जिल्हा हा मुंबई महानगराच्या जवळचा जिल्हा असल्यामुळे ठाणे जिल्ह्यामध्ये शेतीपूरक व्यवसायांच्या विकासाला मोठा वाव असला तरी, या जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय चालवत असताना काही समस्यांचा देखील सामना करावा लागतो. या समस्यांचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे.

**१. दुग्ध व्यवसायासमोरील आव्हाने**

दुग्ध व्यवसायात यशस्वी होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अतिशय महत्वाचा आहे. परंतु जिल्ह्यातील बहुतांशी दुग्ध उत्पादक हे अशिक्षित असल्यामुळे या उत्पादकांना नव्या तंत्राचे प्रशिक्षण, माहितीपुस्तके, व्यवहार सुधारणा याबद्दल पुरेशी माहिती मिळत नाही. विशेषतः दुग्ध प्रक्रिया, सेंद्रिय चारा उत्पादन, रोग प्रतिबंधक उपाय, वेळेवर लसीकरण याबद्दल माहिती आणि प्रशिक्षणाची कमतरता पहायला मिळते. त्याचबरोबर दुग्ध व्यवसायामध्ये उत्पादन वाढविण्यासाठी चारा, वैद्यकीय खर्च, शेड-संरचना यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पाहता त्यांना आपल्याकडील भांडवलाच्या आधारे या घटकांचा विकास करणे शक्य नाही तर ग्रामीण भागातील अपुऱ्या संस्थात्मक वित्तीय संस्थांच्या अपुरा विकास विकास तसेच कागदपत्रांची जाचक अट यामुळे दुध उत्पादकांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे. एवढेच नाही तर दूध हे अत्यंत नाजूक आणि सहज खराब होणारे उत्पादन आहे. दुग्ध व्यवसायासाठी संपूर्ण शीतसाखळी अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु ठाणे जिल्ह्यामध्ये सर्व गावांतून किंवा दुर्गम भागांतून दुध गोळा करण्यासाठी आणि ते शेतकरी व सहकारी संघटनांना सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी पुरेशी शीतसाखळी उपलब्ध नाही. याचा प्रतिकूल परिणाम जिल्ह्यामधील दुग्ध व्यवसायावर होताना दिसून येत आहे.

**२. कुक्कुटपालन व्यावसायासामोरील आव्हाने:**

ठाणे जिल्ह्यातील दमट हवामानामुळे कोंबड्यांमध्ये राणीखेत, बर्ड फ्लू, देवी यांसारखे संसर्गजन्य आजार मोठ्या प्रमाणावर आढळतात. या आजारांवर योग्य वेळी लसीकरण न झाल्यास किंवा पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध न झाल्यास संपूर्ण पोल्ट्री फार्म बाधित होतात. अनेक ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखाने दूर अंतरावर असल्यामुळे तातडीची वैद्यकीय मदत मिळणे कठीण होते. अनेक वेळा वैद्यकीय उपचार करूनदेखील आजारावर निदान होत नाही. परिणामी शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

**३. शेळीपालन व्यावसायासामोरील आव्हाने:**

ठाणे जिल्ह्यातील जास्त पाऊस, दमट हवामान यामुळे शेळयांच्या गोठ्यातील आर्द्रता वाढते. त्यामुळे शेळयांमधील आजारांचे प्रमाण वाढते. तर उन्हाळयामधील अतिउष्णतेमुळे शेळयांची उत्पादनक्षमता कमी होते. हवामानानुसार योग्य व्यवस्थापन न केल्यास मोठे नुकसान सहन करावे लागते. ठाणे जिल्ह्यात संघटित स्वरूपाची शेळी बाजारपेठ फारशी विकसित झालेली नाही. त्यामुळे विक्रीसाठी मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागते. शेतकऱ्यांकडे बाजारपेठेची अद्ययावत माहिती मध्यस्थ शेतकऱ्यांची फसवणूक करतात.

**निष्कर्ष**

ठाणे जिल्ह्यातील शेतीपूरक व्यवसाय शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण आधार ठरत आहेत. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळीपालन, यांसारख्या उद्योगांमुळे रोजगारनिर्मिती व उत्पन्नवाढीच्या मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत. शहरी बाजारपेठेचे सानिध्य, वाहतूक सुविधा व ग्राहकांची वाढती मागणी ही जिल्ह्याची सकरात्मक बाजू आहे. मात्र भांडवलाची कमतरता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, योग्य प्रशिक्षणाची उणीव, बाजारपेठेतील अस्थिरता आणि रोगराई ही प्रमुख आव्हाने आहेत.

**शिफारशी**

जिल्ह्यामध्ये शेतीपूरक व्यवसाय विकसित होण्यासाठी काही सुधारणा होणे गरजेचे आहे जसेकी

१. ठाणे जिल्ह्यामध्ये दुग्धजन्य पदार्थ जसे कि दुध भुकटी, मसाला दुध , एनर्जी दुध, तूप आणि लोणी यासारख्या उतपादानावर भर देणे गरजेचे आहे यासाठी शासनामार्फत प्रक्रिया उद्योग सुरु करणे किंवा शेतकऱ्यांना खाजगी संस्था उभारण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे .

२. इतर शेतकऱ्यांच्या तुलनेने ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये शेतीपूरक व्यवसायांसाठी असणाऱ्या शासकीय योजना तसेच व्यवसाय उभारणी आणि बाजारपेठ अभ्यास याबाबत जागृतातेचा अभाव आहे म्हणून या शेतकऱ्यांमध्ये हि जागृतता निर्माण करणे गरजेचे आहे.

३. ठाणे जिल्ह्यामध्ये शहरी भागाच्या तुलनेने ग्रामीण भागामध्ये संघटीत वित्तीय संस्थांचा अभाव दिसून येत आहे त्याचा प्रतिकूल परिणाम शेतीपूरक व्यवसायांच्या विकासावर होत आहे म्हणून शासनाने जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात वित्तीय संस्थांचे जाळे विकसित करण्यावर भर देणे गरजेचे आहे.

४. शासकीय सुविधा जसेकी दुध खरेदी केंद्र, शासकीय अनुदान, तांत्रिक सहाय्य या सारख्या योजनांचा विकास करणे गरजेचे आहे.

**सारांश**

ठाणे जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, शेळी पालन व कृषी पर्यटन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांच्या विकासाच्या सुवर्ण संधी असून काही आव्हानेदेखील आहेत परंतु शासकीय पुढाकाराने या आव्हानांवर मत करून जिल्ह्यामध्ये शेतीपूरक व्यावसायनच्या सहाय्याने विकास घडून आणणे सहज शक्य आहे.

**संदर्भ साहित्य**

१. मनोज हाडवळे , कृषी पर्यटन एक शेतीपूरक व्यवसाय, सकाळ प्रकाशन, २०१८

२. डॉ. तानाजीराव चोरगे, शेतीपूरक उद्योग, दिलीपराज प्रकाशन, जानेवारी २०१६

३. एकविसाव्या शतकातील उद्योग संधी, स्मार्ट उद्योजक प्रकाशन, प्रथम आवृत्ती, एप्रिल २०१९

४. नाबार्ड, ठाणे जिल्हा, संभाव्यतायुक्त ऋण योजना अहवाल, २०२२-२३

५. ठाणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, वार्षिक अहवाल, २०२४